# विठ्ठलवाडी वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


## पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०० /२०२५ दि. २९/०८/२०२५

**—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—**

**ज्याअर्थी, विठ्ठलवाडी** वाहतूक उप विभागाचे हद्दीत उल्हासनगर कॅम्प नं. ५ येथे दि. ३०/०८/२०२५ रोजी सिंधी बांधवांचा **'चालिया'** उत्सव साजरा होत आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | **१)** उल्हासनगर कॅम्प नं. ५, रेशन ऑफिस रोड, लाल चक्की कडून बाजारपेठ मार्गे दूधनाका बाजूकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लाल चक्की कॉर्नर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर मार्गावरील **दुचाकी, तीनचाकी व हलकी वाहने** लाल चक्की कॉर्नर येथून श्री नारायण बनवारी मार्गे सेक्शन ३६, ३७ मार्गे टेऊराम रोडने इच्छित स्थळी जातील. तसेच **इतर जड वाहने व एस. टी. बसेस** आय. बी. पी. पेट्रोल पंप समोरील रेशन ऑफिस येथून वळवून इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **२)** दूधनाका बाजारपेठ कडून लालचक्की नाका बाजारपेठ कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **दूधनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने दूधनाका येथून टेऊराम आश्रम मार्गे / झुलेलाल मार्केट मार्गे भाटीया रोडने इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **३)** रेशन ऑफिस रोड कडून जीवनघोट आश्रम रोडने चालिया मंदिर कडे येणाऱ्या वाहनांना **जीवनघोट आश्रम** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने जिवन घोट आश्रम येथुनच आलेल्या मार्गाने इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **४)** गांधीरोड तहसिल कार्यालयाकडून मठ मंदिर नाका कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शोभराज गार्डन कॉर्नर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने शोभराज गार्डन कॉर्नर येथुनच आलेल्या मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **५)** मच्छी मार्केट रोडने गल्ली नं. १ व २ मठमंदीर नाक्याकडून वसंतशहा बाजाराकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मठमंदीर नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने मच्छी मार्केट येथे बॅरिकेट लावलेल्या ठिकाणाहुन आलेल्या मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **६)** पोस्ट ऑफिस कडून टिळक चौक कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टिळक चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदरची वाहने स्वामी शांती प्रकाश आश्रम येथुन जुना बस स्टॉप मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | **७)** अंबरनाथ कडे जाणाऱ्या एस. टी बसेस, लॉरी टेम्पो इ. वाहने उल्हासनगर कॅम्प नं. ५ नेताजी चौक, कुर्ला कॅम्प रोड, कैलास कॉलनी मार्गे जातील व त्याच मार्गाने परत येतील. |
| **नो पार्कीग –** | **दूधनाका ते लाल चक्की रस्त्याचे दोन्ही बाजूस** सर्व प्रकारच्या वाहनांना **'नो पार्कीग'** करण्यात येत आहे. |

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना **दि.३०/०८/२०२५** रोजी सकाळी ०५:०० वा. ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

<u>**प्रत माहितीसाठी सादर**</u>

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद

<u>**प्रत कार्यवाहीसाठी**</u> :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – ४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

<u>**प्रत**</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>**प्रत**</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

<u>**प्रत**</u> :– सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/– म.न.पा. उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सूचना फलक लावून घ्यावीत.